क्रमांक - चंशमनपा/न.र./बां.पर./१९९/२०१६

दिनांक - २१ / ०१ / २०१६

# चंद्रपूर शहर महानगरपालिका, चंद्रपूर.

## ☆ प्रारंभ - प्रमाणपत्र ☆

(महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ४४ व महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, १९४९ च्या कलम २५३ अन्वये)

श्री/श्रीमती/सौ. **देवराव विठ्ठलराव वानखेडे व इतर तर्फे मे. जोसा इन्फ्रा थ्रु पार्टनर श्री. दिप सुरेन्द्र दवे**, मौजा/मोहल्ला **भानापेठ**, सर्व्हे/शिट क्र. **५१** ब्लॉक क्र. --- प्लॉट क्र. **६६९२ (मालमत्ता पत्रकानुसार)** या चंद्रपूर शहर महानगरपालिकेच्या हद्दीतील आपले मालकीचे कब्जातील जागेत ------------------- रंगात आराखडयामध्ये दुरुस्ती दर्शविल्याप्रमाणे **निवासाकरीता (फ्लॅट स्किमचे प्रस्तावित बांधकाम) (कम्पाऊंड वॉलसह)** ईमारतीचे बांधकामास पुढील अटी शर्तीस अधीन राहुन बांधकामास परवानगी देण्यांत येत आहे.

**ईमारत व इतर बांधकाम कामगार (रोजगार व सेवाशर्ती नियमन) अधिनियम १९९६ तसेच ईमारत व इतर बांधकाम कामगार कल्याण उपकर नियम १९९८ अंतर्गत उपकराचा युनिक क्रमांक -**

| | | | | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २ | ० | १ | ६ | ३ | ३ | ३ | ३ | २ | ० | ३ | ० | १ | ९ | ९ | ० | ० |

## -- अटी व शर्ती --

१) सदरचे प्रमाणपत्र निर्गमित केलेल्या तारखेपासून एक वर्ष वैध असेल. मुदतीत बांधकाम पूर्ण न झाल्यास परवानगीची
मुदत वाढविणेसाठी विहीत मुदतीत मुदतवाढ प्राप्त करुन घ्यावी.

२) सदरहू बांधकामामुळे भविष्यांत महानगरपालिकेच्या विकास आराखडयामध्ये अगर अन्य कोणत्याही सार्वजनिक कार्यास अडथळा/ बाधा निर्माण झाल्यास बांधकाम तुमचे खर्चाने काढून घ्यावे लागेल. त्या बद्दल नुकसान भरपाई मिळणार नाही.

३) बांधकाम मंजूर केलेल्या आराखडयाप्रमाणे आणि नमुद अटी प्रमाणे करणे बंधनकारक राहील.

४) बांधकामाचे मटेरियल (जसे - बांधकामाची रेती, गिट्टी, विटा) सार्वजनिक ठिकाणी महानगरपालिकेच्या स्वतंत्र लेखी परवानगी शिवाय टाकलेले आढळून आल्यास त्यापोटी विहीत शुल्क जमा केले शिवाय ज्योत्यानंतरची पुढील परवानगी दिली जाणार नाही.

५) बांधकाम पक्क्या स्वरुपाचे करणे आवश्यक राहील. बांधकामामध्ये हलके मटेरियल, गवत, गारा, वगैरे वापरता येणार नाही.

६) इमारतीचे सांडपाणी महानगरपालिकेची गटार लगत असल्यास महानगरपालिकेचे गटारीस महानगरपालिकेची लेखीपुर्व परवानगी घेवून रितसर अनामत व सांडपाणी जोडणी शुल्क रक्कम भरुन सोडावे. लगत गटार नसल्यास स्वतःचे मालकीचे जागेतच सोकपीट बांधून ती व्यवस्था करावी. व लगतच्या इतर भुखंडावरील विहीर, बोरींग इ. जलस्त्रोत विचारात घेऊन त्यापासुन किमान ६ मि. अंतरावर सोकपीटची जागा ठरवावी कोणत्याही सार्व. ठिकाणी अथवा इतरांचे जागेत सांडपाणी सोडल्याचे आढळून आल्यास सदर परवानगी रद्द झाल्याचे समजण्यांत येईल.

७) मंजूर प्लॅन प्रमाणेच बांधकाम करावे. त्याव्यतिरिक्त जादा बांधकाम अथवा कोणतेही बदल केल्याचे निदर्शनास आलेवर महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ व महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील तरतुदीनुसार निष्कासनाची कारवाई करण्यांत येईल. व गुन्हा दाखल करणे तसेच दंड व निष्कासनाचा झालेला खर्च अर्जदाराकडून जमीन महसूल थकबाकी वसुली प्रमाणे केला जाईल.

८) घरांत जाणे येणे करीता महानगरपालिकेचे गटारावर स्लॅप टाकणे आवश्यक असल्यास ती गटारीची रुंदी इतका रुंद व तीन फुट लांब असा महानगरपालिकेचा रस्ता अलग सडक यांचे लेव्हल बरोबर घालावा. त्यापेक्षा जास्त वर येता कामा नये. सदर स्लॅप करीता जादा भाडेपट्टी म.न.पा.कडे भरावी लागेल. याबाबत महानगरपालिकेची अलग रितसर परवानगी घेतली नाही तर म.न.पा. मार्फत केंव्हाही निष्कासन केले जाईल.

९) सदरहू प्लॉटमध्ये कमीत-कमी नविन दहा झाडे लावावी. व सदरची झाडे जतन करावी व त्याची खात्री पटवावी त्याशिवाय बांधलेल्या जागेचा वापर सुरु करण्यासाठी परवानगी दिली जाणार नाही.

१०) बांधकाम पूर्ण झाल्यावर म.न.पा. कडुन बांधकाम पूर्णतेचा दाखला व बांधलेल्या जागेचे वापर प्रमाणपत्र घेतल्याशिवाय वापर सुरु करु नये. तसे आढळून आल्यास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील तरतुदीनुसार अनाधिकृत वापर बाबतची कारवाई करण्यांत येईल.